दूरध्वनी क्रमांक
०२०२५६२२६८०
०२०२५६२२६८८
०२०२५६२२६८९
०२०२५६२२६९०
०२०२५६२२६९१

फॅक्स क्रमांक २५६०११५४

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११००७

**रासेयो/२०२३-२४/२७०** **दि. ११/०८/२०२३**

**प्रति,**
**मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था**
**रासेयो व विविमं जिल्हा समन्वयक**
**सोबत जोडलेल्या यादीतील महाविद्यालये**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : मेरी माटी, मेरा देश उपक्रमांतर्गत जिल्हानिहाय व विद्यापीठस्तरावर स्पर्धांचे आयोजन करणेबाबत**

महोदय/महोदया,

भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांनी केलेल्या आहवानानुसार मेरी माटी, मेरा देश उपक्रमांतर्गत रासेयो स्वयंसेवकांकरिता विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मेरी माटी, मेरा देश उपक्रमांतर्गत रासेयो स्वयंसेवकांकरिता निबंध, वक्तृत्त्व, पथनाट्य, लोकगायन, लोकवाद्य, भित्तीचित्र स्पर्धा जिल्हानिहाय पद्धतीने व विद्यापीठस्तरावर आयोजित करण्यात येणार आहे.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ याठिकाणी सप्टेंबर महिन्यामध्ये स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. वरीलप्रमाणे कलाप्रकारात नैपूण्य असलेल्या आपल्या महाविद्यालयातील निवडक स्वयंसेवकांस स्पर्धेकरिता जिल्हानिहाय आयोजक महाविद्यालयांमध्ये पाठवण्यात यावे. जिल्हानिहाय स्पर्धेतील प्रत्येक कलाप्रकारातील प्रथम तीन क्रमांकास दि. २४ सप्टेंबर, २०२३ रोजी विद्यापीठस्तरावरील स्पर्धेत सहभागी होणे अनिवार्य आहे. संपूर्ण स्पर्धेची अधिक तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे.

**निबंध, वक्तृत्त्व, पथनाट्य, लोकगायन, लोकवाद्य, भित्तीचित्र स्पर्धा विषय, संघ व इतर माहिती (जिल्हानिहाय)**

| क्र. | स्पर्धा | विषय | नियमावली |
|---|---|---|---|
| १ | निबंध | मला भावलेले स्वामी विवेकानंद, स्वामी विवेकानंदांचे शिकागोमधिल व्याख्यान, स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विषयक विचार, स्वामी विवेकानंदांचे भारतीय स्त्रियांबाबत विचार, युवा नेतृत्व : स्वामी विवेकानंद | **शब्द मर्यादा** : १००० शब्द, **भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी, **वेळ** : लेखनासाठी १ तास |
| २ | वक्तृत्त्व | स्वातत्र्यं संग्रामातील अपरिचीत व्यक्तीमत्त्व, भारतीय सण आणि पर्यावरण, माझा गाव माझा इतिहास, जैवविविधता आणि सहजीवन, संस्कृतीच्या पाऊलखुणा जपताना | **भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी, **वेळ** : १० मिनीट+२ मिनीट |
| ३ | भित्तीचित्र | पंचप्रण, मेरी माटी मेरा देश, स्वातत्र्यांचा अमृत महोत्सव, पर्यावरण आणि सहजिवन, लोकसंख्या नियोजन व नियंत्रण | **वेळ** : १ तास, **साहित्य** : फक्त कागद आयोजकांमार्फत देण्यात येईल. रंग व इतर आवश्यक साहित्य घेऊन यावे. |
| ४ | भारतीय लोकगायन | पोवाडा, भारूड, भजन इत्यादी | **वेळ** : १०+२ मिनीट, **संघ** : १+२ साथीदार, **चित्रपटगीत परवानगी नाही** |
| ५ | भारतीय लोकवाद्य | ढोलकी, संबळ, पखवाज, दिमडी, सनई, हलगी, डफ, सुंदरी इत्यादी | **वेळ** : ५+२ मिनीट, **संघ** : १+२ साथीदार |
| ६ | पथनाट्य | पंचप्रण | **वेळ** : १०+२ मिनीट, **संघ** : ७+२ विद्यार्थी |

वरीलप्रमाणे स्पर्धांचे जिल्हानिहाय पद्धतीने आयोजन करताना पुढील वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबत स्वयंसेवकांना सूचित करण्यात यावे.

| **जिल्हानिहाय स्पर्धेकरिता पुढील वेळापत्रकानुसार महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे.** | | | |
|---|---|---|---|
| **क्र.** | **दिनांक** | **तपशील** | |
| १ | १५ ऑगस्ट, २०२३ | झेंडावंदन कार्यक्रमाच्या वेळी मा. प्राचार्य यांनी सर्व स्वयंसेवकांना वरीलप्रमाणे स्पर्धेकरिता महाविद्यालयस्तरावर स्पर्धांमध्ये सहभागी होण्याबाबत आवाहन करण्यात यावे. | |
| २ | १५ ते ३१ ऑगस्ट, २०२३ | **महाविद्यालयांनी महाविद्यालयस्तरावर वरीलप्रमाणे स्पर्धांचे आयोजन करून वरील तक्त्यातील अ.क्र. १ ते ५ कलाप्रकाराकरिता महाविद्यालयातील किमान ५ स्पर्धक सहभागी होणे आवश्यक आहे, यामधून प्रथम क्रमांकाची व अ.क्र.६ करिता ७+२ अशा संघाची निवड करावी. निवड झालेल्या स्वयंसेवकांची माहिती https://forms.gle/xc6w37p5q9WeLvo39 या गुगल लिंकमध्ये दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ पूर्वी कार्यक्रम अधिकाऱ्यांमार्फतच अनिवार्यपणे भरण्यात यावी व सदर स्पर्धकांस पुढील तपशिलानुसार जिल्हानिहाय स्पर्धेकरिता पाठवण्यात यावे. नावनोंदणी केली नसल्यास जिल्हानिहाय स्पर्धेकरिता सहभागी होता येणार नाही.** | |
| **जिल्हानिहाय स्पर्धा वेळापत्रक** | | | |
| **क्र.** | **विभाग व दिनांक** | **आयोजक महाविद्यालयाचे नाव** | **स्पर्धा समन्वयक अधिकारी नाव व संपर्क** |
| १ | **पुणे शहर<br>६/०९/२०२३<br>स. १०.०० वा.** | श्री. शिवाजी मराठा सोसायटीचे समाजभूषण बाबुराव उर्फ आप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शुक्रवार पेठ, पुणे | डॉ. शिवाजी पाचारणे<br>रासेयो, जिल्हा समन्वयक, पुणे शहर<br>९८२२६२६७७८ |
| २ | **पुणे ग्रामीण<br>०७/०९/२०२३<br>स. १०.०० वा.** | पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हडपसर, पुणे | डॉ. सविता कुलकर्णी<br>रासेयो, जिल्हा समन्वयक, पुणे शहर<br>७७२००३६७७४ |
| ३ | **अहमदनगर<br>११/०९/२०२३<br>स. १०.०० वा.** | अ.जी.म.वि.प्र.स., न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, लालटाकी रोड, अहमदनगर | डॉ. गणेश निमसे, रासेयो,<br>विभाग समन्वयक, अहमदनगर<br>९४०४२८१८२८ |
| ४ | **नाशिक<br>०५/०९/२०२३<br>स. १०.०० वा.** | म.वि.प्र.स., कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उत्तममगर, सिडको, नाशिक | डॉ. रविंद्र आहिरे<br>रासेयो, जिल्हा समन्वयक, नाशिक<br>९७६५२१९४२२ |
| आयोजक महाविद्यालयांनी जिल्हानिहाय स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना विद्यापीठस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याकरिता पुढील तपशिलानुसार पाठवण्यात यावे. | | | |
| १ | **दि. २४ सप्टेंबर, २०२३<br>स. १०.०० वा.** | संत नामदेव सभागृह,<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | राष्ट्रीय सेवा योजना कार्यालय<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ<br>०२०-२५६२२६८८,८९,९०,९१ |

तरी वरीलप्रमाणे मेरी माटी, मेरा देश उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धांमध्ये जिल्हास्तरीय व विद्यापीठस्तराव सहभागी होण्याकरिता आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी पाठवण्यात यावेत. जिल्हा व विद्यापीठस्तरीय स्पर्धेत सहभागी स्वयंसेवक यांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**विद्यार्थी विकास मंडळ**

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

*टिप : १. प्रत्येक कलाप्रकारात सहभागी होणे अनिवार्य नाही.*
*२. गुगल लिंकद्वारे माहिती फक्त कार्यक्रम अधिकाऱ्यांनीच भरावी. अन्यथा प्रवेशिका रद्द करण्यात येईल.*